आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१२ डिसेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- रस्ते अपघातात जखमी होणाऱ्यांसाठी विनारोकड उपचार योजना लवकरच देशभरात लागू करण्याची नितीन गडकरी यांची लोकसभेत माहिती, महाराष्ट्रात सुरु असलेले ७८ रस्ते प्रकल्प लवकर पूर्ण करण्याचं आश्वासन
- राज्यसभेत गदारोळामुळे कामकाज दिवसभरासाठी तहकूब
- गुंतवणूकदारांचे प्रस्ताव आणि सल्ला तसंच मदतीसाठी राज्य सरकार कंट्री डेस्क हा विशेष कक्ष स्थापन करणार
- स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२४ च्या सॉफ्टवेअर एडिशनचा आज समारोप

**आणि**

- फिडे बुद्धिबळ स्पर्धेत अटीतटीच्या लढतीत चीनी ग्रँडमास्टर डिंग लिरेनवर मात करत भारताच्या डी. गुकेशची विश्वविजेतेपदाला गवसणी

**<><><><><>**

रस्ते अपघातात जखमी होणाऱ्यांसाठी कॅशलेस उपचार योजना लवकरच देशभरात सुरू होणार असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. या योजनेत दीड लाख रुपयांपर्यंतचे उपचार कॅशलेस पद्धतीनं मिळू शकतील, असं गडकरी म्हणाले.

**होल्ड- बाईट गडकरी**

लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात महाराष्ट्रातल्या राज्य आणि राष्ट्रीय महामार्गांसंदर्भात विविध सदस्यांनी प्रश्न विचारले. धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी महामार्ग भूसंपादनात शेतकऱ्यांना किरकोळ मोबदला मिळत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. धाराशिव शहर सुरत - चेन्नई महामार्गाला जोडण्यासंदर्भात त्यांनी विचारणा केली. टेंभुर्णी - लातूर मार्गाचं

चौपदरीकरणासंदर्भातही त्यांनी विचारणा केली. एका महिन्यात यासंदर्भात निविदा काढली जाईल, असं गडकरी यांनी सांगितलं. परभणीचे खासदार संजय जाधव यांनी परभणीला राष्ट्रीय किंवा राज्यमार्गाला जोडण्यासाठी विनंती केली. यावर, महाराष्ट्रात ७८ प्रकल्प सुरु असून, लवकरात लवकर ते पूर्ण करण्याचं आश्वासन गडकरी यांनी दिलं.

शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाघचौरे यांनी अहिल्यानगर - शिर्डी मार्गाच्या दुरावस्थेचा, नंदुरबारचे खासदार गोवाल पाडवी यांनी पिंपळनेर ते सटाणा रस्त्याबाबत, तर मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी देहू - पंढरपूर पालखी मार्गात असलेल्या संरक्षण विभागाच्या जागेतल्या जागेबाबत विचारणा केली. हे दोन्ही मार्ग लवकरात लवकर पूर्ण होतील, असं गडकरी यांनी सांगितलं.

**<><><><>**

अदानी लाचखोरी आणि अमेरिकन उद्योगपती जॉर्ज सोरोस यांच्या बरोबरच्या काँग्रेस नेत्यांच्या संबंधांवर झालेल्या आरोपप्रत्यारोपामुळे राज्यसभेचं कामकाज आज आधी २ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. दोन वाजता कामकाज सुरु झाल्यानंतर दोन्ही बाजूनं जोरदार घोषणाबाजी सुुरु झाली. गोंधळातच कामकाज सुुरु ठेवण्याचा प्रयत्न अध्यक्ष जगदीप धनखड यांच्या कडून सुरु होता तरीही गोंधळ सुरुच राहिला.

जनता दलाचे खासदार एचडी देवेगौडा यांनी विरोधी पक्षानं दिलेल्या अविश्वास ठरावावर टीका केली. विरोधी पक्षांनी कामकाज सुुरु राहण्यासाठी सहकार्य करण्याचं आवाहन त्यांनी केलं. राज्यसभेतले विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जन खरगे यांनी राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांच्यावर पक्षपाती पणाचा आरोप केला. सत्ताधारी सदस्य काँग्रेसवर विनाकारण आरोप करत असल्याचंही ते म्हणाले. त्यावर राज्यसभेतला गोंधळ अधिक वाढला आणि अखेर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकुब करण्यात आलं.

**<><><><><>**

देशविदेशातल्या गुंतवणूकदारांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी या उद्देशाने राज्य शासनानं विविध उपक्रम सुरू केले आहेत. या उपक्रमांचा एक भाग म्हणून गुंतवणूकदारांचे प्रस्ताव आणि सल्ला तसंच मदतीसाठी कंट्री डेस्क हा विशेष कक्ष स्थापन केला जाणार आहे. त्याचबरोबर नवीन गुंतवणुकीसाठी जागतिक आणि प्रादेशिक व्यापारासोबत सुसंगत धोरण तयार करण्यावर भर दिला जाणार आहे. तसंच, आजपर्यंत सामंजस्य करारांची अंमलबजावणी जलद गतीने करण्यात येईल. तसंच, दूतावास आणि व्यापार संघटनांशी समन्वय वाढवणे, इलेक्ट्रॉनिक्स, कापड, ऑटोमोबाईल आणि औषधनिर्मिती अशा विविध क्षेत्रांना विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे.

**<><><><><>**

परभणीमधल्या संविधान प्रतिकृती अवमान प्रकरणी विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज परभणीत जाऊन पाहणी केली. जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केल्यानंतर, दानवे यांनी नुकसान झालेल्या व्यापारी आस्थापनांची, तसंच इतर ठिकाणांची पाहणी केली.

दरम्यान काल झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी करत आस्थापना बंद ठेवण्याचा पवित्रा व्यापाऱ्यांनी घेतला आहे. याबाबत आज व्यापारी संघाच्या शिष्टमंडळानं जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन म्हणणं मांडलं. त्यावर जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी त्यांना आश्वस्त करत आस्थापना चालू ठेवण्याचं आवाहन केलं.....

**होल्ड- बाईट- रघुनाथ गावडे**

या घटनेचा निषेधार्थ बीड जिल्ह्यात परळीतल्या व्यापारी महासंघ आणि आंबेडकर अनुयायांच्या वतीने उद्या परळी शहर बंदचं आवाहन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी मुख्यमंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची त्यांच्या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी फडनवीस यांनी प्रधानमंत्र्यांना छत्रपती शिवाजी महाराजांची अश्वारूढ मूर्ती भेट म्हणून दिली. देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी महाराष्ट्र महत्त्वाचं राज्य असल्याचं सांगत, राज्याच्या प्रगतीसाठी केंद्र सरकारकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याचं आश्वासन प्रधानमंत्र्यांनी दिलं असल्याचं फडनवीस यावेळी म्हणाले.

या दोन दिवसीय दौऱ्या दरम्यान मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, तसंच आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा यांच्याही सदिच्छा भेटी घेतल्या. या भेटीमध्ये राज्याच्या विकासासाठी विविध योजनांवर चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२४ च्या सॉफ्टवेअर एडिशनचा आज समारोप होत आहे. मुंबईत संध्याकाळी समारोप सत्र होईल. मुंबईत हॅकेथॉन चं आयोजन एल एन वेलिंगकर व्यवस्थापन विकास आणि संशोधन संस्थेनं केलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, विश्लेषण, प्रतिमा विश्लेषण आणि समस्या या विषयांवरल्या स्पर्धांमध्ये ३४ संघ सहभागी झाले होते. याबाबत केंद्रप्रमुख निलेश लेले यांनी सांगितलं.

**होल्ड--बाईट--लेले**

पुण्यात हॅकेथॉनचं आयोजन एमआयटी कला, डिझाईन आणि तंत्रज्ञान विद्यापीठाने केलं होतं. नागपूरमध्ये जी एच रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयात हॅकेथॉन आयोजित केलं होतं. त्यात सहभागी झालेल्या AICTE च्या नवोन्मेष विभागाचा प्रादेशिक व्यवस्थापक मयुर बोरकर याने सांगितलं….

**होल्ड - बाईट - मयुर बोरकर**

स्मार्ट इंडिया हॅकेथॉनची अंतिम फेरी काल देशभरातल्या ५१ केंद्रांवर सुरु झाली. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दूरस्थ माध्यमातून या हॅकेथॉनचं उद्घाटन केलं होतं. तसंच, हॅकेथॉनमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांशी प्रधानमंत्र्यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधला. देशातले युवक सरकारला साथ देत देशासमोरच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी काम करत आहेत, त्यामुळे भारत विकसित होण्याच्या मार्गावर आहे, याबद्दल आपल्याला विश्वास वाटतो असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

फिडे बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत अटीतटीच्या लढतीनंतर भारताचा डी. गुकेश विश्वविजेता ठरला आहे. गुकेश हा विश्वनाथन आनंदनंतर बुद्धिबळाचा विश्वविजेता ठरलेला दुसरा भारतीय तर सर्वात कमी वयाचा पहिला बुद्धिबळपटू ठरला आहे.

त्याने त्याचा प्रतिस्पर्धी आणि चीनच्या डिंग लिरेन याचा या खेळाच्या १४व्या फेरीअखेर पराभव केला. या अंतिम सामन्याच्या पहिल्या १३ फेऱ्या बरोबरीत सुटल्या होत्या.

**<><><><><>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पुढच्या दोन दिवसांत सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता आहे. राज्यात गेल्या २४ तासांत सर्वात

कमी ९ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद गोंदिया आणि नागपूरमध्ये झाली आहे. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित वाढ झाली असून मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी मात्र तापमानात किंचित घट झाली आहे.